ePaper

**भारताकडे जाणारे रस्ते खुले करा, तारा हटवा! पीओकेवर 25 हजार नागरिक जमले**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™




पान 3 वरुन...

योजना कागदावर नको, थेट नागरिकांच्या दारात पोहोचवा!

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 30 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## रशियात सर्वात कठीण चाचणी यशस्वी; सुरक्षेसाठी 'गेमचेंजर'

# भारताचे 'कावेरी इंजिन' सुप्पर पास!



**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने भारताने महत्त्वाची झेप घेतली आहे. भारताच्या स्वदेशी बनावटीच्या 'कावेरी ड्राय इंजिन'ने रशियातील उच्च उंचीवरील आणि उड्डाण चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. या चाचण्यांमध्ये इंजिनने ४६ किलो न्यूटनच्या लक्ष्यापेक्षा अधिक म्हणजे ४८.५ किलो न्यूटन थ्रस्ट निर्माण केला. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (DRDO) गॅस टर्बाइन रिसर्च एस्टॅब्लिशमेंटने (GTRE) विकसित केलेल्या या इंजिनच्या कामगिरीमुळे भारताच्या स्वदेशी एरो-इंजिन विकासाला महत्त्वाची चालना मिळाली आहे.**

रशियातील चाचण्यांदरम्यान विरळ हवा, कमी हवेचा दाब आणि अत्यल्प तापमान अशा प्रतिकूल परिस्थितीत इंजिनची कार्यक्षमता तपासण्यात आली. विविध उंची, वेग आणि थ्रस्टच्या परिस्थितीत इंजिनने स्थिर कामगिरी केल्याचे चाचण्यांमधून दिसून आले. कावेरी ड्राय हे आफ्टरबर्नर नसलेले इंजिन आहे. त्यामुळे मानवरहित विमानांसाठी आवश्यक असलेल्या दीर्घकाळच्या उड्डाणाच्या दृष्टीने त्याचा उपयोग होऊ शकतो. आफ्टरबर्नर नसल्याने इंधनाचा वापर आणि उष्णता उत्सर्जन कमी ठेवण्याचा फायदा मिळू शकतो.

कावेरी ड्राय इंजिनचा वापर DRDOच्या महत्त्वाकांक्षी 'घातक' स्टेल्थ मानवरहित लढाऊ विमानासाठी करण्याची योजना आहे. पायलटशिवाय शत्रूच्या हद्दीत खोलवर प्रवेश करून विविध लढाऊ मोहिमा पार पाडण्यासाठी या प्रकारच्या मानवरहित विमानांचा विकास केला जात आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी स्वदेशी प्रणोदन प्रणाली विकसित करण्याच्या दृष्टीने कावेरी ड्राय इंजिनची चाचणी महत्त्वाची मानली जात आहे. मात्र, रशियातील चाचण्या यशस्वी झाल्याने इंजिनला तत्काळ अंतिम वापराची मंजुरी मिळाली आहे, असे म्हणता येणार नाही.

आता इंजिनच्या हवाई योग्यतेसाठी CENTRE FOR MILITARY AIRWORTHINESS AND CERTIFICATION (CEMILAC) कडून आवश्यक प्रमाणन मिळवणे हा पुढील महत्त्वाचा टप्पा आहे. प्रमाणनानंतर संबंधित विमानाच्या प्रोटोटाइपमध्ये इंजिनचे एकत्रीकरण करून पुढील उड्डाण चाचण्या घेतल्या जातील. त्यानंतरच मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि प्रत्यक्ष वापराबाबतचा मार्ग स्पष्ट होईल. दरम्यान, GTREकडून कावेरी इंजिनच्या अधिक शक्तिशाली पुढील आवृत्तीच्या विकासावरही काम सुरू आहे. भविष्यातील लढाऊ विमानांसाठी स्वदेशी एरो-इंजिन विकसित करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पातून मिळणारे तांत्रिक अनुभव महत्त्वाचे ठरू शकतात.

कावेरी इंजिनचा मूळ विकास तेजस लढाऊ विमानासाठी करण्यात आला होता. मात्र अपेक्षित कामगिरी साध्य करण्यात आलेल्या अडचणींमुळे त्याचा तेजसमध्ये वापर होऊ शकला नाही. त्यानंतर या तंत्रज्ञानाच्या आधारे कावेरी ड्राय इंजिनचा विकास करण्यात आला. रशियातील चाचण्यांमध्ये ४८.५ किलो न्यूटन थ्रस्टची नोंद होणे हे या दीर्घ प्रयत्नातील महत्त्वाचे यश मानले जात आहे. आता प्रमाणन, विमानात एकत्रीकरण आणि प्रत्यक्ष उड्डाण चाचण्यांमध्ये मिळणारे परिणाम भारताच्या स्वदेशी एरो-इंजिन कार्यक्रमासाठी पुढील दिशा ठरवणार आहेत.

### 'घातक' स्टेल्थ लढाऊ ड्रोनसाठी गेमचेंजर

डीआरडीओचा 'घातक' हा भारताचा महत्त्वाकांक्षी मानवरहित लढाऊ विमान प्रकल्प आहे. पायलटशिवाय शत्रूच्या हवाई हद्दीत खोलवर घुसून बॉम्बफेक करण्याची आणि अचूक क्षेपणास्त्र हल्ले करण्याची क्षमता या ड्रोनमध्ये असेल. परदेशी इंजिनवर अवलंबून राहण्यामुळे उद्भवणारे राजनैतिक धोके आता टळणार आहेत. कावेरी ड्राय इंजिनमुळे घातक प्रकल्पाला १००% स्वदेशी शक्ती मिळणार असून, भविष्यातील प्रगत यूएव्ही प्रकल्पांसाठीही एक भक्कम पाया तयार झाला आहे.

### अमेरिकन इंजिनला सक्षम पर्याय

सध्या भारताचे 'तेजस एमके-१ए' लढाऊ विमान अमेरिकेच्या जनरल इलेक्ट्रिक इंजिनवर अवलंबून आहे. मात्र अमेरिकेकडून होणाऱ्या पुरवठ्यातील विलंबाने अनेक लढाऊ विमानांचे उत्पादन रखडले आहे. २०३० च्या दशकात जेव्हा तेजस विमानांची पहिली ओव्हरहॉल सायकल येईल, तेव्हा 'मिड-लाईफ अपग्रेड' अंतर्गत अमेरिकन इंजिन काढून तिथे पूर्णपणे स्वदेशी 'कावेरी २.०' बसवण्याची भारताची व्यूहरचना आहे. यामुळे परदेशी पुरवठा साखळीच्या अडचणी कायमच्या निकालात निघतील.

# ९० कोटींच्या रस्त्याची निविदा नियमानुसारच होणार

## मी कोणाच्या सांगण्यावरून किंवा दबावाला बळी पडणार नाही - आयुक्त नवल किशोर राम

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महापालिकेच्या ९० कोटी रुपयांच्या रस्त्याचे काम आपल्या मर्जितील ठेकेदाराला न मिळाल्यामुळे सत्ताधारी भाजपच्या एका आमदाराने थेट पालिका आयुक्त नवल किशोर राम यांना अॅट्रोसिटी दाखल करण्याची, तर इतर अधिकाऱ्यांना शिवीगाळ करत हक्कभंगाची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. मात्र, या प्रकरणावर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया देत, "कोणत्याही दबावाला बळी न पडता सर्व कामे नियमांनुसार आणि पारदर्शक पद्धतीनेच होतील," असा इशारा दिला आहे.**



आयुक्तांनी सांगितले की, मी यापूर्वी पुण्याचा जिल्हाधिकारी म्हणूनही काम केले आहे. लोकप्रतिनिधींशी माझे व्यावसायिक आणि वैयक्तिक संबंध नेहमीच चांगले राहिले आहेत. महापालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने काही गैरसमज किंवा मतभेद कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांशी होऊ शकतात. मात्र, माझ्याशी कोणाचाही वैयक्तिक वाद झालेला नाही आणि होणारही नाही. मी आधी चांगला माणूस आणि मग चांगला अधिकारी असण्यावर विश्वास ठेवतो. मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन प्रकल्पांतर्गत संगमवाडी पूल ते बंडगार्डनदरम्यान १७ मीटर रुंदीच्या पर्यायी रस्त्यासाठी डिसेंबर २०२५ मध्ये ९० कोटींची निविदा काढण्यात आली होती. संबंधित आमदाराने एका पात्र ठेकेदाराला अपात्र ठरवण्यासाठी दबाव आणला होता. मात्र, आयुक्तांच्या निर्देशानुसार पारदर्शक छाननी झाली आणि त्याच ठेकेदाराचा दर सर्वांत कमी आल्याने आमदाराच्या मर्जितील ठेकेदाराचा पत्ता कट झाला. त्यावर बोलताना आयुक्त म्हणाले की, लोकांचे म्हणणे मांडण्याचा हक्क लोकप्रतिनिधींना आहे, परंतु प्रशासनाचा अंतिम निर्णय हा पूर्णपणे पारदर्शक आणि नियमाला धरूनच राहील.

### दबावाखाली येणार नाही

निविदा प्रक्रियेबाबत प्रशासकीय दृष्ट्या योग्य तोच निर्णय घेण्यात आला आहे. निविदेमध्ये माझा कोणताही वैयक्तिक रस नसतो. नियम बाजूला ठेवून मी कोणतेही काम करू शकत नाही. मी कोणाच्या सांगण्यावरून किंवा दबावाखाली येऊन निर्णय घेणारा अधिकारी नाही. कामांमध्ये कोणतीही दुटप्पी भूमिका न ठेवता पूर्ण पारदर्शकता आणि निष्पक्षता असावी, असे राज्याच्या मुख्यमंत्र्यांचेही स्पष्ट आदेश आहेत. त्यामुळे दबाव आणून काम करण्याचे प्रयत्न निष्फळ ठरतील असेही त्यांनी स्पष्ट केले.

# माळेगाव साखर कारखाना देशातील आदर्श कारखाना बनवण्याचे स्वप्न

**महाईन्यूज । पुणे**

**माळेगाव सहकारी साखर कारखाना हा अग्रगण्य कारखाना म्हणून ओळखला जातो. लोकनेते अजितदादांचे या कारखान्याबद्दल नेहमीच प्रेम राहिले आहे. हा कारखाना देशात आदर्श आणि सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना बनवण्याचे त्यांचे स्वप्न होते. तेच स्वप्न आपणाला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.**





यासाठी सर्व संचालक, शेतकरी सभासदांना विश्वासात घेऊन कामकाज केले जाईल. सभासदांनी देखील सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री व माळेगाव कारखान्याचे अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी सोमवारी (दि.२८) कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केले.

यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष नितीन शेडे, ज्येष्ठ संचालक चंद्रराव तावरे, बाळासाहेब तावरे, बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव, सभापती किरण तावरे, खरेदी-विक्री संघाचे रमेश देवकाते, कृषी उत्पन्न समितीचे विनायक गावडे, विश्वासराव देवकाते, सुयोग सातपुते, संचालक तानाजी कोकरे, योगेश जगताप, नितीन सातव, स्वप्निल जगताप, अविनाश देवकाते, विजय तावरे, शिवराज जाधवराव, प्रताप आटोळे, राजेंद्र बुरुंगले, गणपतराव खलाटे, सतीश फाळके, विलास देवकाते, जयपाल देवकाते, देविदास गावडे, दत्तात्रय येळे, रामदास आटोळे, विशाल जगताप, संगीता कोकरे, ज्योती मुलमुले, चंद्रशेखर जगताप, कार्यकारी संचालक जितेंद्र रणवरे आदींसह शेतकरी सभासद उपस्थित होते.

सभेच्या निमित्ताने अनेक शेतकरी सभासदांनी आपले मनोगत व्यक्त करताना काही सूचना केल्या तसेच कारखान्याच्या कामकाजातील त्रुटी दाखविण्याचा प्रयत्न केला. निश्चितच त्या सर्वांचा विचार करून असणाऱ्या त्रुटी व कामकाजातील अनियमित यामध्ये सुधारणा केली जाईल. माळेगाव कारखान्याची तुलना सोमेश्वर कारखान्याच्या ऊसदराशी केली जाते. माळेगाव कारखान्याचा इतिहासातील हा दिलेला उच्चांकी ऊस दर असल्याचे सुनेत्रा पवार यांनी नमूद केले. तसेच यापुढे देखील ऊस दरामध्ये कमी पडणार नाही, अशी ग्वाही दिली. यावेळी ज्येष्ठ नेते चंद्रराव तावरे, विश्वासराव देवकाते, योगेश जगताप, नितीन सातव, मदननाना देवकाते, राजेश देवकाते, प्रा. ज्ञानदेव बुरुंगले, दिग्विजय कोकरे, विलास सस्ते, प्रकाश सोरटे, दशरथ राऊत, अरविंद बनसोडे, प्रेमभैया खलाटे, अशोकदादा तावरे, सोपान आटोळे, प्रकाश देवकाते, अशोकबापू जाधव, विकास जगताप, बाबू कारंडे, विश्वास जगताप आदींनी मत व्यक्त केले. स्वागत कार्यकारी संचालक जितेंद्र रणवरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिल धुमाळ यांनी, तर आभार उपाध्यक्ष नितीन शेडे यांनी मानले. माळेगाव कारखान्याच्या ७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अशा वेळी वारंवार सूचना देऊनही सभासद ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते त्यामुळे उपमुख्यमंत्री व कारखान्याच्या अध्यक्षा सुनेत्रा वहिनी पवार यांनी स्वतः माईक हातात घेऊन सभेवर ताबा मिळवला व अत्यंत शांत व संयमी भाषेत सभासदांना शांत करत आपले विचार मांडावेत, असे आवाहन केले.

### ऊस उत्पादकांचा सत्कार

शासनाचा कृषिभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल छाया तानाजी पवार यांचा, तर एकरी उसाचे जास्तीचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये शशिकांत सुपेकर, तेजस जगताप, प्रदीप जगताप, माधव बनकर, मंगेश सोळणकर, भुजंग टेंगले, गोरख तावरे, अभिषेक तावरे, अशोक तावरे, निलेश टेंगले, कृष्णराव कोकरे, नलिनी जगताप, सूर्यकांत बनकर, पिंकेश जमदडे, शशांक जमदडे, धीरज कोकरे, अरविंद निंबाळकर, मनोहर जगताप, जैनुद्दीन मुजावर, देविदास गुरव, अरविंद जगताप, सोनाबाई कोकरे, नंदकुमार जगताप, वर्षा जगताप आदींचा सन्मान करण्यात आला.

> शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या कामकाजाविषयी तसेच संस्थेच्या सचिवांच्या मनमानी कारभाराविषयी सभासदांनी विचार मांडले. त्याबाबत निश्चितपणे शिवनगर विद्या प्रसारक मंडळाच्या कामकाजाची सखोल चौकशी करून निर्णय घेतला जाईल. कोणताही अपप्रचार खपवून घेतला जाणार नाही.
>
> **- सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री.**

# योजना कागदावर नको, थेट नागरिकांच्या दारात पोहोचवा!

## जनकल्याण शिबिराचे प्रदेशाध्यक्षांकडून कौतुक; ६४ शिबिरांतून ८५०० हून अधिक लाभार्थी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**केंद्र आणि राज्य सरकार योजना बनवते, परंतु त्या योजना यशस्वीपणे लोकांपर्यंत घेऊन जाणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते. योजनेचा फक्त प्रचार पुरेसा नाही, तर त्याची संपूर्ण अंमलबजावणी झाल्यावर लोकांच्या चेहऱ्यावर येणारे समाधान हीच कोणत्याही लोकप्रतिनिधीची ताकद असते. अशा शब्दात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांनी आयोजित केलेल्या लाभार्थी शिबिराचे कौतुक केले. आज (दि. २९ सप्टेंबर) वाकडमध्ये भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयातर्फे आयोजित लाभार्थी शिबिरात भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यावेळी ते बोलत होते.**




### रविंद्र चव्हाण यांचे वक्तव्य

"सरकार योजना बनवतेच परंतु या योजना यशस्वीपणे लोकांपर्यंत घेऊन जाणे हे लोकप्रतिनिधींचे काम असते. योजनेचा फक्त प्रचार पुरेसा नाही तर त्याची संपूर्ण अंमलबजावणी झाल्यावर लोकांच्या चेहऱ्यावर येणारे समाधान हीच कोणत्याही लोकप्रतिनिधीची ताकद असते. भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांनी तंत्रज्ञान आणि संवाद यंत्रणांचा उत्तम मेळ घालून जनकल्याण शिबिर आयोजित केले आहेत. आतापर्यंत राहुल कलाटे यांच्या माध्यमातून ६४ शिबिर आयोजित करण्यात आले असून, ८५०० हून अधिक लाभार्थ्यांपर्यंत ते पोहोचू शकले हे कौतुकास्पद आहे."

### मान्यवरांची उपस्थिती...

श्री विठ्ठल रखुमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद आणि सदस्य यांच्यावतीने श्री रविंद्र चव्हाण यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक राहुल कलाटे, समितीचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद आणि वाकड ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रसंगी चिंचवडचे आमदार शंकरशेठ जगताप, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, गटनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक रेश्मा भुजबळ, कुणाल वाव्हळकर, धर्मपाल तंतरपाळे, श्री विठ्ठल रखुमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद आणि सदस्य, लाभार्थी ज्येष्ठ नागरिक, महिला, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'च्या निमित्ताने वाकड येथे 'लाभार्थी शिबिरा'अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात लाभ वितरण व प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ प्रातिनिधिक स्वरूपात प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले, "तंत्रज्ञान आणि संवाद यंत्रणांचा उत्तम मेळ घालून राहुल कलाटे यांनी 'जनकल्याण शिबिर' आयोजित केले आहेत. आतापर्यंत कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून ६४ शिबिरं आयोजित करण्यात आले आणि त्यातून सुमारे ८५०० हून अधिक लाभार्थ्यांना ते समाधान मिळवून देऊ शकले हे कौतुकास्पद आहे. कारण योजनेची संपूर्ण अंमलबजावणी महत्त्वाची असते."

"देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः 'सेवा' भावनेने कार्यरत असतात. त्याच विचारांचा पायंडा पुढे नेत नगरसेवक राहुल कलाटे राबवत असलेल्या उपक्रमाचे विशेष कौतुक वाटते. आपल्या समस्या ऐकून घेणारे कोणीतरी हक्काचे माणूस आहे हा विश्वास आणि दिलासा कलाटे यांच्या कार्यपद्धतीतून इथल्या नागरिकांना मिळतोय याबद्दल खात्री आहे." असेही चव्हाण यावेळी बोलताना म्हणाले.

"लोकांनी त्यांचे प्रश्न घेऊन आपल्याकडे येणं स्वाभाविक आहे. पण आपण आणि आपले 'जनसंपर्क कार्यालय' थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने 'जनकल्याण शिबिर' उपक्रम सुरू करण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेवा संकल्प सुरु असून, इथे कोणतेही सेवा शुल्क न घेता नागरिकांना लाभ मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न असतो. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.", असे राहुल कलाटे यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासोबतच विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने नगरसेवक राहुल कलाटे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून गेल्या सहा महिन्यांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या 'जनकल्याण शिबिरा'च्या माध्यमातून सोसायटी, गावठाण तसे वस्ती भागात आतापर्यंत ६४ हून अधिक शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांच्या माध्यमातून साडेआठ हजारांहून अधिक नागरिकांना विविध योजना, सुविधा आणि आवश्यक मार्गदर्शनाचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

# ज्ञानेश कुमार यांच्या हकालपट्टीची मागणी; पिंपरीत संभाजी ब्रिगेड-सिपीएमचा एल्गार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारताच्या निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे संभाजी ब्रिगेड व सिपीएम यांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली.**




यावेळी आंदोलकांनी 'ज्ञानेश कुमार यांना अटक करा', 'नरेंद्र मोदी राजीनामा द्या', 'अमित शहा राजीनामा द्या', 'आरएसएस-भाजपा सरकार चले जाओ' अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला.

या आंदोलनात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर सिपीएमचे सचिन देसाई, लोकसागर संघटनेचे डॉ. सुरेश बेरी बामसेफचे लहू अनारसे अखिल भारतीय हिंदू महासभेचे शहराध्यक्ष राहुल मदने यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण जिल्हा उपाध्यक्ष भैय्यासाहेब गजधने शहर उपाध्यक्ष गणेश देवराम सचिव मंगेश चव्हाण संघटक प्रकाश घोडके सामाजिक कार्यकर्ते विशाल सरवदे भारताचा कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादीचे कॉम्रेड सचिन अनिसचे सुधीर मुरुडकर, श्रीराम नलावडे,सुरेश बावनकर,नवजवान भारत सभेच्या स्वप्रजा व ललिता तसेच जनवादी महिला संघटनेच्या जयश्री साळोखे आणि रिया सागवेकर दिलीप कैतके,साहेबराव साळुंखे, सोनिया दिपके यांनी आंदोलनात सहभाग घेतला.

निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत सार्वजनिक पातळीवर उपस्थित झालेल्या प्रश्नांची सखोल चौकशी झाली पाहिजे अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची पदावरून हकालपट्टी करून त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई व गुन्हा दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत नागरिकांच्या मनात कोणतीही शंका निर्माण होऊ नये, यासाठी पारदर्शकता आणि निष्पक्षतेबाबत ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी विविध वक्त्यांनी केली.

या आंदोलनाचे आयोजन संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे आणि सिपीएमचे सचिन देसाई यांनी केले होते.



## भूमिका

**महाराष्ट्रातील साखर हंगाम यंदा अनेक आव्हानांनी वेढलेला आहे. एल निनोचा प्रभाव, पावसातील अनिश्चितता आणि त्यामुळे ऊस उत्पादनात झालेली घट यामुळे केवळ महाराष्ट्राच नव्हे, तर देशाच्या साखर व्यवस्थेचीही कसोटी लागणार आहे. आगामी दोन साखर हंगामांचा विचार करता केंद्र आणि राज्य सरकारने आतापासूनच ठोस नियोजन करणे आवश्यक आहे.**

# साखर हंगामाचा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा हवा



केवळ ग्राहकांच्या हिताचा विचार करून निर्णय घेतले तर त्याचा सर्वाधिक फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसू शकतो. देशाला दरवर्षी सरासरी सुमारे २८० लाख टन साखरेची गरज असते. यंदाचे उत्पादन त्या तुलनेत किती राहील, याबाबतच अनिश्चितता आहे. दुष्काळ आणि पाण्याची कमतरता यामुळे ऊस उत्पादन घटल्यास पुढील २०२७-२८ चा हंगाम आणखी कठीण होऊ शकतो.

आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर वाढलेले असताना आयातीचा पर्यायही महागडा ठरू शकतो. त्यामुळे उपलब्ध साखरेचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, ऊस पुरेसा परिपक्व होण्यापूर्वी कारखाने सुरू करणे हा शेतकरी आणि कारखानदार दोघांसाठीही चिंतेचा विषय आहे. साधारणपणे १५ नोव्हेंबर ते १५ एप्रिल हा साखर उत्पादनासाठी अनुकूल काळ मानला जातो. ऊसाची वाढ पूर्ण न झाल्यास वजन कमी होते आणि साखरेचा उताराही घटतो. परिणामी कारखान्यांचा उत्पादन खर्च वाढतो आणि शेतकऱ्यालाही अपेक्षित मोबदला मिळत नाही. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांना टनाला ५०० रुपये अनुदान, साखरेचा खरेदी दर ५० रुपये आणि इथेनॉलचा दर प्रतिलिटर ७० रुपये करण्याची मागणी केली आहे. कारखाने १५ ऑक्टोबरला सुरू करू नयेत, अशी भूमिकाही त्यांनी घेतली आहे. ही भूमिका सरकारसमोर वेगळे आव्हान उभे करते.

दुसरीकडे, २०१९ पासून साखरेचा क्विंटलमागील दर ३,१०० रुपयांवर स्थिर आहे, तर ऊसाची एफआरपी सातत्याने वाढली आहे. परिणामी कारखान्यांवर कर्जाचा भार वाढला असून त्यांना मदतीसाठी सरकारला आर्थिक हस्तक्षेप करावा लागत आहे. साखरेच्या खरेदी दरात योग्य वाढ केल्यास हा गुंता काही प्रमाणात सुटू शकतो. कडधान्ये आणि अन्य अन्नधान्यांच्या तुलनेत साखरेच्या दरात झालेली वाढ कमी आहे. त्यामुळे ग्राहकांचा विचार महत्त्वाचा असला, तरी ऊस उत्पादक शेतकरी हा देखील वाढत्या उत्पादनखर्चाचा सामना करणारा शेतकरीच आहे, हे विसरून चालणार नाही. खत, वीज, पाणी आणि मजुरीच्या वाढत्या खर्चात निसर्गाच्या संकटाची भर पडली आहे. साखरेचा तुटवडा टाळणे आवश्यकच; पण त्यासाठी अपरिपक्व ऊस गाळपाला पाठवण्याची घाई करून शेतकऱ्यांचे नुकसान करणे हा उपाय ठरू शकत नाही. सरकारने ग्राहक, कारखाने आणि शेतकरी या तिन्ही घटकांचा समतोल साधणारे धोरण आखले पाहिजे. साखरेच्या उपलब्धतेपेक्षा शेतकऱ्याच्या जगण्याची किंमत मोठी आहे, याचे भान निर्णय घेताना ठेवणे हीच खरी कसोटी आहे.

## प्रासंगिक »

# मातीचा घडा

**एका गावात विठ्ठल नावाचा कुंभार राहत होता. त्याचा मुलगा अमोल रोज वडिलांना घडे बनवताना पाहायचा. एकदा अमोलने विचारले, “बाबा, तुम्ही मातीला इतके फिरवता, दाबता आणि थापता; तरी ती तुटत का नाही?”**

विठ्ठल म्हणाला, “कारण प्रत्येक थाप तिचे रूप अधिक मजबूत बनवते.” काही दिवसांनी अमोलने स्वतः घडा बनवण्याचा प्रयत्न केला. चाकावर माती ठेवताच ती एका बाजूला वाकली. त्याने रागाने ती माती फेकून दिली.

वडिलांनी त्याला थांबवले आणि म्हणाले, “मातीने पहिल्याच प्रयत्नात सुंदर घडा बनवला नाही म्हणून तू तिला निरुपयोगी समजशील का?” अमोल शांत झाला. त्याने पुन्हा माती घेतली. अनेकदा घडा वाकला, फुटला; पण प्रत्येक वेळी त्याने आपली चूक सुधारली. काही दिवसांनी त्याने सुंदर आणि मजबूत घडा तयार केला.

विठ्ठल हसून म्हणाला, “अपयश आपल्याला तोडण्यासाठी येत नाही; ते आपल्याला योग्य आकार देण्यासाठी येते.”

- तात्पर्य : अपयशातून शिकणारा माणूसच यशाचा मजबूत पाया घालतो.

मणिपूरमधील हिंसाचाराला तीन वर्षांचा कालावधी उलटत आला, तरी शांततेचा मार्ग अद्याप स्पष्ट झालेला नाही. हिंसा, हत्या, विस्थापन आणि परस्पर अविश्वास यांचे दुष्टचक्र कायम आहे.

# मणिपूरच्या जखमांवर मलम कधी?



सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे हिंसाचाराची तीव्रता कमी होण्याऐवजी संघर्षाचे स्वरूप बदलत आहे. मैतेई आणि कुकी-झो यांच्यातील संघर्षाबरोबरच नागा आणि कुकी-झो यांच्यातील तणावही वाढत आहे. एका संघर्षावर तोडगा निघण्याआधी दुसरा संघर्ष उभा राहणे, ही परिस्थिती राज्याच्या प्रशासनासाठी गंभीर आव्हान आहे.

या पार्श्वभूमीवर सशस्त्र दल विशेष अधिकार कायद्याला म्हणजेच ‘अफ्स्पा’ला मुदतवाढ देण्यात आली आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सुरक्षा दलांना विशेष अधिकार देणे हा एक प्रशासकीय उपाय असू शकतो; मात्र केवळ लष्करी उपस्थितीमुळे सामाजिक संघर्षाची मुळे दूर होत नाहीत. जमीन, ओळख, राजकीय प्रतिनिधित्व आणि सुरक्षिततेची भावना या प्रश्नांवर राजकीय संवादातून तोडगा शोधावा लागेल. मणिपूरसमोरील आणखी एक मोठे आव्हान म्हणजे मोठ्या प्रमाणावर लुटली गेलेली शस्त्रे. त्यातील किती शस्त्रे परत मिळाली आणि उर्वरित शस्त्रे कोणाच्या ताब्यात आहेत, याबाबत पारदर्शकता आवश्यक आहे. ‘सस्पेन्शन ऑफ ऑपरेशन्स’ कराराच्या अंमलबजावणीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. या करारातील अटींचे उल्लंघन होत असल्यास निष्पक्ष चौकशी आणि कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. म्यानमारलगतची सीमा आणि सीमापार अस्थिरता हा स्वतंत्र सुरक्षेचा प्रश्न आहे. मात्र त्याचा भार सामान्य नागरिकांच्या जीवावर पडता कामा नये. प्रत्येक समुदायाला स्वतःच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र सशस्त्र किंवा स्वयंसेवी यंत्रणा उभारावी लागत असेल, तर राज्यव्यवस्थेवरील विश्वास कमकुवत होत असल्याचे ते लक्षण आहे.

नाकेबंदी स्थगित होणे, चर्चा सुरू होणे आणि काही काळ शांतता निर्माण होणे पुरेसे नाही. सर्व समुदायांना सहभागी करून घेणारी कालबद्ध राजकीय प्रक्रिया, शस्त्रसंकलनाची पारदर्शक मोहीम, हिंसाचारातील प्रत्येक घटनेची निष्पक्ष चौकशी आणि दोषींवर वेळेत कारवाई आवश्यक आहे. सरकार कोणत्याही एका समुदायाच्या बाजूने नसून सर्व नागरिकांच्या सुरक्षेसाठी समानपणे उभे आहे, हा विश्वास निर्माण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. मणिपूरचा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नाही; तो सामाजिक सलोखा, संघराज्यीय विश्वास आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी जोडलेला आहे. विशेष अधिकारांची मुदतवाढ हा तात्पुरता उपाय असू शकतो; मात्र कायमस्वरूपी शांततेसाठी संवाद, न्याय आणि राजकीय तोडगाच निर्णायक ठरणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



युक्ताहार न लगे आणिक साधनें ।
अल्प नारायणें दाखविलें ॥१॥

कलियुगामाजी करावें कीर्तन ।
तेणें नारायण देइल भेटी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरे बंधूंच्या मोर्चाबाबत फडणवीसांची प्रतिक्रिया

## लोकशाहीत आंदोलन करण्याचा प्रत्येकाला अधिकार; मी टीका करणार नाही

**महाईन्यूज । मुंबई**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी भाजपाला धार्जिणे निर्णय घेतल्याची बातमी समोर आली. ज्यानंतर ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. ४ ऑक्टोबरला होणाऱ्या मोर्चाबाबत आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईत ठाकरे बंधूंचा मोर्चा ४ ऑक्टोबरला निघणार आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी संयुक्त पत्रकार परिषद घेत याबाबत माहिती दिली.**



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात ठाकरे बंधूंचा मोर्चा ४ ऑक्टोबरला निघणार आहे. हा मोर्चा भायखळ्यातील रिचर्डसन क्रुडास कंपनी ते मुंबई महापालिका इथपर्यंत निघणार आहे. सकाळी १० वाजता मोर्चाला सुरूवात होईल. त्यानंतर ११ ते ११.३० च्या दरम्यान मुंबई महापालिकेच्या जवळ या मोर्चाचं रूपांतर सभेत होईल अशी माहिती मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी दिली आहे. निवडणूक आयुक्तांबाबत जे काही सांगितलं जातं आहे ते कपोलकल्पित आहे असं भाजपाने म्हटलं आहे. दरम्यान याबाबत राज ठाकरेंना विचारलं असता राज ठाकरे म्हणाले आम्ही जर का निवडणूक आयोगाच्या विरोधात मोर्चा काढत असू तर मग भाजपाला काय त्रास होतो आहे? मराठीत एक म्हण आहे खाई त्याला खवखवे असं म्हणत राज ठाकरेंनी भाजपाला टोला लगावला आहे.

आम्ही जो मोर्चा काढतो आहोत तो निवडणूक आयोगाच्या विरोधातला मोर्चा आहे. २०१७ आणि २०१८ मध्येही मी अनेक नेत्यांना भेटलो होतो. ईव्हीएमच्या संदर्भातही मी चर्चा केली होती. ४ ऑक्टोबरला याबाबतची सगळी सविस्तर भूमिका आम्ही मांडू. ४ ऑक्टोबरच्या मोर्चानंतर पुढे काय करायचं ते आम्ही ठरवू. सर्वच राजकीय पक्षांना आम्ही या मोर्चासाठी आमंत्रण देत आहोत. उद्या सत्ताधारी पक्षातल्या लोकांनाह जरी या व्यासपीठावर यायचं असेल तर ते येऊ शकतात. हा कुठलाही राजकीय पक्षाच्या विरोधापेक्षा निवडणूक आयोगाचा जो काही गेल्या वर्षांतला कारभार आहे त्याविरोधातला मोर्चा आहे असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

### नेमक काय म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस?

"लोकशाहीत आंदोलन करण्याचा सगळ्यांना अधिकार आहे. कोण आंदोलन करतं आहे त्यावर मी टीका करणार नाही. फक्त ज्या मुद्द्यांवर आंदोलन करतो आहोत तो मुद्दा किती खरा आहे हे समजून घेतलं पाहिजे किंवा आपण जी उदाहरणं देतो ती उदाहरणं किती खरी आहेत हे पण समजून घेतलं पाहिजे. मला वाटतं यापेक्षा जास्त बोलण्याची आवश्यकता नाही. त्यांचं आंदोलन झाल्यावर त्यावर योग्य प्रतिक्रिया दिली जाईल."

# महाराष्ट्रातील माजी अग्निवीरांसाठी शासकीय नोकरीत १० टक्के समांतर आरक्षण

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्रातील माजी अग्निवीरांना शासनाच्या गट-क गणवेशधारी सेवांच्या भरतीत दहा टक्के समांतर आरक्षण देण्याचा, तसेच माजी अग्निविरांना शासकीय, निमशासकीय सेवेत दाखल करून घेण्यासाठी धोरण निश्चित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.**



केंद्र शासनाने भारतीय सशस्त्र सेनेच्या – भूदल, नौदल आणि वायुदल यांच्याकरिता सन २०२२ मध्ये अग्निपथ सैन्यभरतीची योजना सुरु केली. या योजनेत १७.५ ते २१ वर्षे वयोगटातून चार वर्षाच्या कालावधीकरीता सैन्य दलांमध्ये भरती केली जाते. या अग्निवीरांना शिस्त, नेतृत्व, तांत्रिक कौशल्य, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा आणि संघटनात्मक कार्यपद्धतीचे कठोर प्रशिक्षण दिले जाते. चार वर्षाच्या सेवेनंतर कामगिरी, शिस्त आणि कौशल्य या निकषांच्या आधारे २५ टक्के अग्निविरांना कायमस्वरुपी सैन्यदलात सामावून घेतले जाते. उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांना सेवानिवृत्त केले जाते.

अशा माजी अग्निवीरांना गृह विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, वन विभाग, नगर विकास विभाग आदी प्रशासकीय विभागांतर्गत विविध आस्थापनांवरील गणवेशधारी गट-क सेवांमध्ये नियुक्ती देण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती स्थापन केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार धोरण निश्चित करण्यात आले असून, त्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. त्यानुसार महाराष्ट्राचा रहिवाशी असलेल्या माजी अग्निवीरांकरिता १० टक्के समांतर आरक्षण देण्यात येणार आहे. हे आरक्षण १० % समांतर आरक्षण कप्पीकृत समांतर आरक्षण (COMPARTMENTAL HORIZONTAL RESERVATION) राहील. काही पदांच्याबाबतीत दहा टक्क्यांहून अधिक समांतर आरक्षणाची आवश्यकता वाटल्यास, सामाजिक आरक्षण अबाधित राहील या अटीच्या अधीन राहून ही मर्यादा वाढविण्याचे अधिकार उच्चस्तरीय सचिव समितीस देण्यात आले. या आरक्षणानुसार भरती करण्यात येणारी गणवेशधारी गट – क पदे संबंधित विभाग व आस्थापनानिहाय पुढील प्रमाणे : पोलीस महासंचालक व अधिनस्त आस्थापना – पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई, राज्य पोलीस दल / राज्य राखीव पोलीस दल. महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा – कारागृह शिपाई. नागरी संरक्षण संचालनालय – अग्निशामक, बचावकर्ता, विमोचक, सहायक उपनियंत्रक (FIREMEN/ RESCUER). महासंचालक, गृहरक्षक दल – हवालदार निदेशक, कनिष्ठ निदेशक, यांत्रिक निदेशक, निदेशक, प्रर्वतक. राज्य गुप्तवार्ता विभाग – पोलीस शिपाई खलाशी (इंजिन साईड) पोलीस शिपाई खलाशी (डेस्क साईड). राज्य उत्पादन शुल्क विभाग – जवान, जवान-नि-वाहनचालक. वन विभाग – वनरक्षक, नगर विकास विभाग (महानगरपालिका) – अग्निशामक विमोचक, अग्निशामक.

या पदाकरिंता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेतून माजी अग्निवीरांना पूर्णपणे सूट मिळणार आहे. वयोमर्यादेत सूट, शारीरिक कार्यक्षमता चाचणी (PET) व शारीरिक मानक चाचणी (PST) सूट, ज्येष्ठता व पदोन्नती तसेच प्रशिक्षण तसेच अन्य अनुभव, कौशल्ये याबाबत सविस्तर शासन निर्णय काढण्यास मान्यता देण्यात आली.

# पाकिस्तानचा बांगलादेशला दणका

## इंधनवाहू रशियन विमानास ऐनवेळी नाकारले हवाई क्षेत्र; अणुऊर्जा प्रकल्पाचे काम लांबणीवर

**महाईन्यूज** । पाकिस्तान

**बांगलादेशला अणुऊर्जा प्रकल्पासाठी इंधन घेऊन जाणाऱ्या विमानासाठी पाकिस्तानने हवाई क्षेत्र खुले करण्यास नकार दिला आहे. बांगलादेशमधील रूपपूर येथे पहिला वहिला अणुऊर्जा प्रकल्प सुरु होत आहे. या प्रकल्पाच्या युनिट-२ साठी २४ सप्टेंबर रोजी रशियातून इंधन घेऊन जाणारे विमान दाखल होणार होते. मात्र, पाकिस्तानकडून या विमानासाठी हवाई क्षेत्र खुले करण्यास नकार दिला.**



बांगलादेशमध्ये पहिला अणुऊर्जा प्रकल्प सुरु होणार आहे, यासाठी इंधन मिळवून प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यावर त्यांचा भर आहे. बांगलादेश सध्या ऊर्जा तुटवड्याचा सामना करत आहे. अशा पाकिस्तानने इंधन घेऊन येणाऱ्या विमानाला हवाई क्षेत्र वापरण्यास नकार दिल्याने याचा थेट फटका बांगलादेशच्या अणुऊर्जा प्रकल्पाला बसणार आहे. यामुळे प्रकल्प कार्यान्वित होण्यास देखील विलंब होणार आहे.

हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय पाकिस्तानकडून ऐनवेळी घेण्यात आला, असे बांगलादेशी माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. विशेष म्हणजे बांगलादेशी अणुऊर्जा आयोगाने मात्र कोणत्या देशाने हवाई क्षेत्र बंद केले याबाबत मौन बाळगले आहे. ढाका विमानतळावर विमानाच्या स्वागतासाठी सर्व तयारी करण्यात आली होती मात्र, हवाई क्षेत्र बंद केल्याची माहिती कंपनीकडून देण्यात आली. दरम्यान, यामुळे बांगलादेशचा अणुऊर्जा प्रकल्प लांबणीवर पडला असून, यात पर्यायी मार्गाने इंधन पुरवण्याची सोय केली आहे. प्रकल्प ऑक्टोबरमध्ये कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. पाकिस्तानने या प्रकरणी स्पष्टीकरण देताना या घटनेमागे तांत्रिक आणि कार्यपद्धतीशी निगडीत कारणे दिली आहेत.

दरम्यान, बांगलादेशने पर्यायी मार्गाने अणुइंधनाची वाहतूक करण्याची तयारी सुरू केली आहे. या पर्यायी व्यवस्थेमुळे प्रकल्पाच्या कामावर होणारा विलंब काही प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, इंधन पुरवठ्यातील अडथळ्यामुळे प्रकल्पाच्या नियोजित वेळापत्रकावर परिणाम झाला आहे. बांगलादेशचा हा पहिला अणुऊर्जा प्रकल्प असल्याने त्याच्या कार्यान्वयनाकडे देशाचे विशेष लक्ष आहे. ऊर्जा तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर प्रकल्प सुरू झाल्यास वीज निर्मिती क्षमता वाढण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. सध्या प्रकल्प ऑक्टोबरमध्ये कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुढील काळात इंधन पुरवठा आणि वाहतुकीची प्रक्रिया सुरळीत होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रशियन कंपनीवर युरेनियम पुरवण्याची जबाबदारी

रुपपूर येथील अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम रशियातील रोसटोमने हाती घेतले असून, त्यांच्यावरच बांगलादेशला युरेनियम पुरवण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पाकिस्तानने हवाई क्षेत्र वापरण्यास परवानगी दिली नसल्याचे स्पष्ट करतच इस्लामाबादकडून त्याचे कारण देण्यात आले नसल्याची माहिती बांगलादेशचे विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री फकीर महबूब अनम यांनी माध्यमांना दिली. रशियातून येणारे अजरबैझान, कझाकस्तान, पाकिस्तान आणि भारत असा प्रवास करुन राजधानी ढाकामध्ये उतरणार होते.

---

# कॉक्रोच जनता पार्टी नव्हे, तर राजीनामा जनता पार्टी; रामदास आठवलेंची टीका

**महाईन्यूज** । तमिळनाडू

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी एसआयआरसह आणखी काही निर्णय कथित मनमानीपणे घेतल्याची बातमी समोर आल्यानंतर देशभरात मोठी खळबळ उडाली आहे. यावरून ज्ञानेश कुमार यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका होत असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे. कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनीही ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत थेट देशव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.**



अभिजीत दिपके यांनी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केल्याच्या संदर्भात बोलताना केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी कॉक्रोच जनता पार्टीवर जोरदार टीका केली आहे. कॉक्रोच जनता पार्टीचं नाव बदलून 'राजीनामा जनता पार्टी' असं ठेवलं पाहिजे, अशी खोचक टीका रामदास आठवले यांनी दिपके यांच्यावर केली आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

दरम्यान, जुलैमध्ये नीट-यूजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या कथित प्रकरणावरून कॉक्रोच जनता पार्टीने दिल्लीत आंदोलन केलं होतं आणि त्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या अनुषंगाने बोलताना रामदास आठवले यांनी म्हटलं की, "कॉक्रोच जनता पार्टी फक्त आणि फक्त राजीनाम्यांचीच मागणी करत असते. त्यामुळे सीजेपीने आपलं नाव बदलून 'राजीनामा जनता पार्टी' असं ठेवावं."

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. "ज्ञानेश कुमार हे देशातील सर्वात मोठे देशद्रोही असून त्यांनी लोकशाही धोक्यात आणली आहे," असा गंभीर आरोप करत दिपके यांनी त्यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी केली. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास देशभरात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिलेला आहे. दिपके यांनी म्हटलं की, ज्ञानेश कुमार मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यापासून देशात कोणी मतदान करायचे आणि कोणी नाही, हे ते स्वतः ठरवत आहेत. ही कसली लोकशाही? त्यांनी संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच कोलमडवून टाकली आहे," असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

### रामदास आठवले काय म्हणाले?

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सध्या विरोधक आक्रमक झाले आहेत. भारतीय निवडणूक आयोगातील कथित अंतर्गत मतभेदांमुळे निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मंत्री रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया देताना अभिजीत दिपके यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. "कॉक्रोच जनता पार्टीने आपलं नाव बदलून 'राजीनामा जनता पार्टी' असं ठेवावं", अशा शब्दांत मंत्री रामदास आठवले यांनी टीका केली. अभिजीत दिपके यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशव्यापी आंदोलनाची हाक दिली.

# ‘मिर्झापूर’च्या चाहत्यांसाठी डबल धमाका.!




बंदुकींच्या फैरी, रक्तरंजित सत्तासंघर्ष, धक्कादायक ट्विस्ट आणि अंगावर काटा आणणारे संवाद... ‘मिर्झापूर’ म्हटलं की या सगळ्या गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या राहतात. ओटीटीच्या दुनियेत आपल्या वेगळ्या अंदाजाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणाऱ्या या क्राइम-थ्रिलर फ्रँचायझीची क्रेझ आजही कायम आहे. तीन सीझननंतर आता चाहत्यांना प्रतीक्षा आहे ती ‘मिर्झापूर सीझन ४’ची. त्यातच ‘गोलू गुप्ता’ची भूमिका साकारणाऱ्या श्वेता त्रिपाठी शर्मा हिने सीझन ४ संदर्भात दिलेल्या अपडेटमुळे चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. ‘मिर्झापूर’च्या विश्वात सध्या मोठी घडामोड सुरू आहे. वेब सीरिजमधील लोकप्रिय पात्रांना मोठ्या पडद्यावर घेऊन आलेला ‘मिर्झापूर: द मूव्ही’ ४ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. गुरमीत सिंह दिग्दर्शित या सिनेमात पंकज त्रिपाठी, अली फजल, दिव्येंदु शर्मा, रसिका दुग्गल, श्वेता त्रिपाठी शर्मा आणि श्रिया पिळगांवकर यांच्यासह अनेक कलाकार झळकले आहेत. या सगळ्या चर्चेदरम्यान आता ‘मिर्झापूर’ सीझन ४बाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. मालिकेत गोलू गुप्ता ही व्यक्तिरेखा साकारणाऱ्या श्वेता त्रिपाठी शर्मानि SCREENला दिलेल्या मुलाखतीत सीझन ४च्या कामाबाबत माहिती दिली आहे. श्वेताच्या म्हणण्यानुसार, सध्या ‘मिर्झापूर’च्या पुढील चित्रपटावरही काम सुरू असून सीझन ४च्या पटकथेवरही काम सुरू आहे.



# ऐश्वर्याचा ‘पॅरिस फॅशन वीक’मध्ये रॉयल अंदाज

अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन पॅरिसमध्ये आयोजित एका भव्य फॅशन इव्हेंटमध्ये सहभागी झाली होती. यावेळी ती रॉयल लुकमध्ये पाहायला मिळाली. तिच्या दमदार रॅम्प वॉकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी ऐश्वर्याला पाहण्यासाठी तिच्या चाहत्यांची चांगलीच गर्दी जमली होती. यावेळी ५२ वर्षांची ऐश्वर्या अत्यंत रुबाबदार अंदाजात दिसून आली. या कार्यक्रमात ऐश्वर्यासह आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय असलेले कलाकारही सहभागी झाले होते. ऐश्वर्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर येताच सोशल मीडियावर तिच्यावर कौतुकाचा वर्षाव सुरू झाला. पॅरिस फॅशन वीकदरम्यान आयोजित ‘लोरियाल पॅरिस’च्या इव्हेंटमध्ये ऐश्वर्याने आयफेल टॉवरसमोर रॅम्प वॉक केला. या भारतीय सौंदर्यवतीला पाहून तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाची नजर तिच्यावरच खिळली. ऐश्वर्याने ग्लॅमरस अदा दाखवत कॅमेरासाठी पोज देऊन उपस्थितांची मनं जिंकली. ऐश्वर्या राय बच्चनने परिधान केलेला हा गाऊन यारा शोमेकर या डिझायनरने बनवला होता. ऐश्वर्यासोबत सिमोन ऐश्ली, वियोला डेविस, जेन फोंडा आणि सेलीन डियोन हे सेलिब्रिटीही या इंटरनॅशनल इव्हेंटमध्ये सहभागी झाले होते.



# गोविंदाची पत्नी कोट्यवधींची मालकीण!

बॉलिवूड अभिनेता गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता अहुजा सध्या त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून या दोघांच्या कौटुंबिक नात्याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. अशातच सुनीता अहुजा यांच्या संपत्तीची आणि कमाईच्या मार्गांची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे, सुनीता यांनी चित्रपटांमध्ये मुख्य अभिनेत्री म्हणून काम केलेले नसतानाही त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. टेलिव्हिजन, रिॲलिटी शो, यूट्यूब आणि इतर माध्यमांतून त्या कमाई करत असल्याचे सांगितले जाते. सुनीता अहुजा या अभिनेता गोविंदा यांच्या पत्नी आहेत. गोविंदा यांच्या चित्रपट कारकिर्दीत सुनीता यांनी त्यांना साथ दिली. गोविंदा यांच्या यशस्वी प्रवासात सुनीता यांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जाते. लग्नानंतर सुनीता यांनी कुटुंब आणि मुलांच्या संगोपनाला प्राधान्य दिले. गोविंदा आणि सुनीता यांना दोन मुले आहेत. अनेक वर्षे त्यांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळली. मात्र, गेल्या काही वर्षांत सुनीता यांनी मनोरंजन क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली. सुनीता अहुजा यांनी टेलिव्हिजन आणि रिॲलिटी शोमध्ये सहभाग घेतला आहे. त्यामुळे त्या पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या चर्चेत आल्या आहेत. ‘लॉकअप २’ या रिॲलिटी शोमध्ये त्यांच्या सहभागाची चर्चा झाली होती. तसेच ‘लाफ्टर शेफ्स : अनलिमिटेड एंटरटेनमेंट’ या कार्यक्रमातही त्या दिसल्या. या कार्यक्रमात त्यांची उपस्थिती आणि कुटुंबातील सदस्यांसोबतचे नाते चर्चेचा विषय ठरले.

# नीरू धांडाने साधला 'गोल्डन निशाणा'!

## ३६ वर्षांनंतर महिलांच्या शूटिंग ट्रॅप प्रकारात भारताला पहिलंच पदक

**महाईन्यूज । जपान**

**आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. नेमबाजीत भारतीय खेळाडूंनी आणखी एका पदकाला गवसणी घातली आहे. नेमबाज नीरू धांडाने इतिहासाला गवसणी घातली आहे. नीरू धांडा ही महिलांच्या वैयक्तिक ट्रॅप शूटिंग इव्हेंटमध्ये सुवर्ण पदक जिंकणारी पहिलीच खेळाडू ठरली आहे.**

नीरू धांडाने फायनलमध्ये ३० पैकी २८ अचूक निशाने साधले आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील पहिल्या सुवर्ण पदकावर नाव कोरलं. तर रौप्यपदकाची कमाई करणाऱ्या चीनच्या यूनॉन्ग सुनने ३० पैकी २६ निशाने साधले. २८ अचून निशाने साधण्यासह नीरू धांडाने आशियाई विक्रम मोडून काढला आहे. याआधी आशियाई क्रीडा स्पर्धेत चीनी ताइपेच्या वान यू लियूने २४ अचून निशाने साधून हा विक्रम आपल्या नावावर केला होता. आता नीरू धांडाने हा विक्रम मोडून काढला आहे.

यासह नीरू धांडाने भारताची ३६ वर्षांची प्रतीक्षा संपवली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत १९९० मध्ये पहिल्यांदा महिलांच्या शॉटगन ट्रॅप वैयक्तिक इव्हेंटचा समावेश करण्यात आला होता. तेव्हापासून आतापर्यंत जितक्या स्पर्धा झाल्या, त्यामध्ये भारताला एकही पदक जिंकता आलं नव्हतं. २०२६ मध्ये आयची- नागोयामध्ये भारताने शूटिंग ट्रॅप इव्हेंटमध्ये पहिलं पदक पटाकावलं आहे. नीरू धांडाने भारतासाठी सुवर्णपदक पटकावलं आहे.

या पदकासह नीरू धांडाने आशियाई रेकॉर्ड मोडून काढला आहे.नीरूने ३० पैकी २८ अचूक निशाने साधले. याआधी महिलांच्या वैयक्तिक ट्रॅप स्पर्धेतील आशियाई रेकॉर्ड २४ गुणांचा होता. हा रेकॉर्ड चीनी ताइपेच्या वान यू लियूने १९ जानेवारी २०२६ मध्ये आपल्या नावावर केला होता. आता अवघ्या काही महिन्यांनंतर नीरू धांडाने हा रेकॉर्ड मोडून काढला आहे.



## क्रिकेटपटू दीपक चाहरच्या तीन महागड्या बॅट चोरीला

**महाईन्यूज । मुंबई**



भारतीय संघाचा स्टार गोलंदाज आणि आयपीएल २०२६ स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाचं प्रतिनिधित्व केलेल्या दीपक चाहरचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये तो, ३ बॅट चोरीला गेल्याची माहिती देताना दिसून येत आहे. या व्हिडिओमध्ये तो म्हणाला, ज्याने या बॅट चोरी केल्या आहेत, त्यांना या बॅटची किंमत किती आहे हे माहीत नसावं. त्याचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

क्रिकेटपटू म्हटलं तर बॅट हा जिव्हाळ्याचा विषय असतो. बॅट तुटणं किंवा चोरीला जाणं हे वेदना देणारं असतं. दरम्यान दीपक चाहर ज्या मैदानावर सराव करत होता. त्या मैदानावरून त्याचे ३ बॅट चोरीला गेल्या आहेत. या बॅट कोणी चोरल्या हे अद्यापही कळू शकलेलं नाही. त्यामुळे दीपक चाहरने चोरीला गेलेल्या बॅट पुन्हा आणून द्या, हवं तर पैसे घ्या, अशी विनंती करणारा व्हिडिओ शेअर केला आहे.

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये दीपक चाहर म्हणाला, "काल संध्याकाळी माझ्या बेअर एडिशनच्या ३ बॅट मैदानातून चोरीला गेल्या आहेत. तुम्हाला काय वाटतं, मी आता काय करायला हवं? चोरी झालेल्या बॅट खूपच चांगल्या होत्या. त्या तिन्ही बॅटची किंमत जवळपास दीड लाख इतकी आहे. ज्याने चोरी केल्या आहेत, त्यालाही माहीत नसेल की त्या बॅट किती महागड्या आहेत. तो जाईल आणि त्या बॅट विकून टाकेल किंवा मग टेनिस बॉलने खेळणार. माझ्याकडे आता अनेक पर्याय आहेत. पोलिसांत जाऊन तक्रार करू, योगीजींकडे जाऊ किंवा मग पंतप्रधान मोदींकडे जाऊन तक्रार करू. नाहीतर मग, बॅट मिळू दे म्हणून देवाकडेच प्रार्थना करेन."

## श्री चरणीने मोडला मेगन शूटचा 'विश्वविक्रम'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयसीसीकडून महिलांची टी-२० रँकिंग जाहीर करण्यात आली आहे. या रँकिंगमध्ये भारताची २२ वर्षांची स्टार फिरकीपटू श्री चरणीने एका नव्या विक्रमाला गवसणी घातली आहे. या रँकिंगमध्येही श्री चरणी अव्वल स्थानी कायम असून तिने महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वोत्तम रेटिंग मिळवण्याचा मान पटकावला आहे. तिने आतापर्यंतचे सर्वोत्तम ८१७ रेटिंग पॉईंट्स मिळवले आहेत. यासह ऑस्ट्रेलियाच्या मेगन शूटचा रेकॉर्ड मोडून एक नवा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.**



श्री चरणीला जेव्हा जेव्हा संधी मिळाली आहे, तिने संधीचं सोनं केलं आहे.भारतीय संघाला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धा जिंकून देण्यातही तिने मोलाची भूमिका बजावली होती. तसेच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील कमी सामन्यांमध्ये तिने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. आता तिने असा काही रेकॉर्ड केला आहे, जो याआधी कुठल्याही गोलंदाजाला करता आला नव्हता. श्री चरणीने मेगन शूटचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. नोव्हेंबर २०१८ मध्ये मेगन शूटने सर्वाधिक ८०६ रेटिंग पॉईंट्सपर्यंत मजल मारली होती. आता मेगन शूटहून ११ अधिक रेटिंग पॉईंट्सची कमाई करून श्री चरणी ही महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ८१७ रेटिंग पॉईंट्स मिळवणारी जगातील पहिलीच गोलंदाज ठरली आहे.

आशिया चषक स्पर्धेसाठीही तिला भारतीय संघात स्थान देण्यात आलं होतं. या स्पर्धेतही तिच्या गोलंदाजीचाा बोलबाला पाहायला मिळाला. या स्पर्धेत सर्वाधिक गडी बाद करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत ती दुसऱ्या स्थानी राहिली. या स्पर्धेत गोलंदाजी करताना तिने १२ गडी बाद केले.यादरम्यान श्रीलंकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात तिने अवघ्या २० धावा खर्च करून ४ गडी बाद केले. या गोलंदाजीच्या बळावर भारतीय संघाने श्रीलंकेवर ७२ धावांनी विजय मिळवला आणि जेतेपदावर नाव कोरलं.

आशिया चषक स्पर्धेत चमकल्यानंतर आशियाई क्रीडा स्पर्धेतही तिच्या गोलंदाजीची जादू पाहायला मिळाली. या स्पर्धेत जपानविरुद्ध झालेल्या क्वार्टर फायनलच्या सामन्यात तिने १० धावा खर्च करून ४ गडी बाद केले होते.त्यानंतर श्रीलंके विरुद्ध झालेल्या फायनलमध्ये तिने २ गडी बाद केले. भारतीय संघाने हा सामना एकतर्फी जिंकून सुवर्णपदकावर नाव कोरलं.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
दि. 30 सप्टेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# चिखलीत ८०० कोटींच्या बॅटरी संशोधन केंद्राची उभारणी



## पिंपरी-चिंचवड ‘एज्युकेशन हब’च्या संकल्पाला आता संशोधनाची जोड! सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्सचा करार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडला ‘एज्युकेशन हब’ बनवण्याच्या संकल्पाला आता प्रगत संशोधनाची जोड मिळणार आहे. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्स यांच्यात चिखली येथील रिसर्च पार्कमध्ये स्वदेशी बॅटरी संशोधन व विकास केंद्र उभारण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे. ८०० कोटींहून अधिक गुंतवणूक प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाचे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी स्वागत केले आहे.**




> “पिंपरी-चिंचवडची ओळख औद्योगिक शहर म्हणून आहे. आता या औद्योगिक सामर्थ्याला शिक्षण आणि स्वदेशी संशोधनाची जोड देण्याचा आमचा संकल्प आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली चिखलीतील हा प्रकल्प युवा अभियंत्यांसाठी नवी संधी निर्माण करेल. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्स यांचे मनापासून आभार आहेत. प्रस्तावित गुंतवणुकीतून स्थानिक युवकांना कौशल्य आणि रोजगाराच्या प्रत्यक्ष संधी निर्माण होतील, असा विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात उद्योग, संशोधन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. चिखलीतील हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक आणि औद्योगिक क्षमतेला नवी दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. करारावर सीओईपीतर्फे कुलसचिव डॉ. डी. एन. सोनावणे आणि जेएसडब्ल्यू समूहातर्फे कार्यकारी उपाध्यक्ष नरेश ललवाणी यांनी स्वाक्षऱ्या केल्या.



प्रस्तावित केंद्रात लिथियम-आयन, सोडिअम-आयन आणि इतर प्रगत तंत्रज्ञानावर आधारित बॅटरी सेलचे संशोधन, प्रोटोटायपिंग व प्रमाणीकरण होणार आहे. केंद्र दोन टप्प्यांत विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून एक हजार रोजगारसंधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांना आणि युवा अभियंत्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर प्रत्यक्ष काम करण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. या भागीदारीबाबत जेएसडब्ल्यू समूहाचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांनी, “सेल हे या शतकातील नवीन इंधन असून हे सेल भारतातच तयार करण्याची वेळ आली आहे,” असे म्हटले आहे. सीओईपीसोबतची भागीदारी उद्योग, संशोधन आणि शिक्षण क्षेत्राला नवा आयाम देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### ८०० कोटींची गुंतवणूक; एक हजार रोजगारांची अपेक्षा

चिखलीतील प्रस्तावित बॅटरी संशोधन केंद्र दोन टप्प्यांत विकसित केले जाणार आहे. लिथियम-आयन, सोडिअम-आयनसह प्रगत बॅटरी तंत्रज्ञानावर संशोधन, प्रोटोटायपिंग आणि प्रमाणीकरण होणार असून, विद्यार्थ्यांना व युवा अभियंत्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर काम करण्याची संधी मिळणार आहे.

पिंपरी-चिंचवडला ‘एज्युकेशन हब’ म्हणून विकसित करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे आमदार लांडगे यांनी सांगितले. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ तसेच सीओईपी आणि आयआयएम नागपूरच्या शैक्षणिक संधी शहरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा त्यांनी उल्लेख केला. आता चिखलीतील बॅटरी संशोधन केंद्रामुळे या संकल्पात उद्योगाशी जोडलेल्या संशोधनाची भर पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वदेशी बॅटरी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी झालेल्या भागीदारीबद्दल लांडगे यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्सचे अभिनंदन केले. प्रस्तावित गुंतवणुकीतून दर्जेदार संशोधन, कौशल्यविकास आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पावसाळ्यातही सोसायट्यांना टँकरचा आधार!

## पाणीपुरवठ्यावर 'श्वेतपत्रिका' आणि तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मुळशी धरण परिसरात मुसळधार पावसाचा हंगाम सुरू असतानाही शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना अपुऱ्या, अनियमित आणि कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यामुळे टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महासंघ (पीसीसीएचएसएफ) याविरोधात आक्रमक झाला आहे. महासंघाने महापालिका प्रशासनाकडे आठ तातडीच्या मागण्या केल्या असून, आठवडाभरात ठोस कार्यवाही न झाल्यास २ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यानंतरच्या तारखेला शांततापूर्ण लोकशाही मार्गाने आंदोलनाचा इशारा दिला आहे.**

महासंघाने २१ सप्टेंबर २०२६ रोजी महापालिका आयुक्त, महापौर, 'ड' क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता, नगरसेवक आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार यांना निवेदन पाठवले. हे पत्र २२ सप्टेंबर रोजी आयुक्त कक्षात स्वीकारण्यात आले.

पवना धरणातून सुमारे तीन आठवड्यांपूर्वी अतिरिक्त पाणी सोडण्यात आले, याकडे महासंघाने लक्ष वेधले आहे. धरणात मुबलक पाणी असूनही गृहनिर्माण सोसायट्यांना गरजेनुसार नियमित आणि पुरेसा पुरवठा होत नाही, हा मूलभूत प्रश्न असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पावसाळ्यात नैसर्गिकरीत्या पाणी वाढलेले असताना नागरिकांना टँकरसाठी जादा पैसे मोजावे लागणे हे महापालिकेच्या जलव्यवस्थापनाचे गंभीर अपयश असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. यामुळे हजारो कुटुंबांवर आर्थिक आणि मानसिक ताण येत आहे.

नवीन बांधकाम प्रकल्पांना मंजुरी देताना पाणीपुरवठ्याच्या क्षमतेचा स्वतंत्र व सार्वजनिक आढावा का घेतला जात नाही, असा थेट सवाल महासंघाने उपस्थित केला आहे. पाणीपुरवठा, टँकर आणि बांधकाम परवानग्या यांच्या निर्णय प्रक्रियेत हितसंबंधांचा संघर्ष (Conflict of Interest) होणार नाही, याची खात्री देणारी यंत्रणा कोणती, अशीही विचारणा आहे. सोसायट्यांना कृत्रिमरीत्या कमी पाणी देऊन टँकरवर अवलंबून ठेवले जात आहे का, अशी नागरिकांमध्ये शंका असून पाणी कपात, टँकरची वाढती मागणी आणि पुरवठादार यांच्यात काही अनुचित संबंध (नेक्सस) आहे का, याची निष्पक्ष चौकशी करावी, असे निवेदनात म्हटले आहे.




### साठवणुकीचा नवा भुर्दंड

एक दिवसाआड येणाऱ्या पाण्यामुळे अनेक सोसायट्यांना दोन दिवसांचे पाणी साठवावे लागते. त्यासाठी अधिकच्या टाक्या बांधण्याची नवी अडचण निर्माण झाली असून त्याचा खर्च लाखोंमध्ये जात आहे. "याला जबाबदार कोण?" असा प्रश्न महासंघाने विचारला आहे. पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या वाकड, पुनावळे, ताथवडे, थेरगाव, शनी मंदिर रोड, पिंपळे सौदागर परिसरातील ३४ सोसायट्यांची यादी निवेदनासोबत जोडण्यात आली आहे. त्यात श्री गणेश इम्पेरिया, कोहिनूर कोर्टयार्ड, पाम स्प्रिंग, कॅप्रिचिओ, भगवती रॉयल, एडन गार्डन, वेस्टर्न अव्हेन्यू, नंदन इन्स्पेरा, एमराल्ड पार्क, लेगसी अर्बानिया आदींचा समावेश आहे. थकीत करदात्यांना स्मरणपत्रे पाठवण्यात महापालिका प्रशासन अत्यंत सक्रिय असते. नागरिकांनी भरलेल्या करातून मिळणारी मूलभूत सुविधा नियमित आणि पुरेशी देण्यातही तितकीच तत्परता अपेक्षित असल्याचे महासंघाने नमूद केले आहे.

### महासंघाच्या प्रमुख मागण्या

- सर्व गृहनिर्माण सोसायट्यांचा झोननिहाय पाणीपुरवठा, दाब, वेळापत्रक आणि प्रत्यक्ष मिळणाऱ्या पाण्याचे तातडीने सर्वेक्षण करावे.
- पवना धरणातील साठा, उचल, वितरण आणि शहरातील प्रत्यक्ष वापराचे पारदर्शक आकडे जाहीर करावेत.
- पाणी उपलब्ध असूनही पुरवठा अपुरा का, याची तांत्रिक चौकशी करून अहवाल जाहीर करावा.
- नवीन बांधकाम प्रकल्पांना मंजुरी देताना पाणीपुरवठा क्षमतेचा स्वतंत्र आढावा अनिवार्य करावा.
- पाणीपुरवठा, टँकर आणि बांधकाम परवानग्यांमध्ये हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी स्वतंत्र देखरेख यंत्रणा उभारावी.
- सोसायट्यांना अनावश्यक टँकरवर अवलंबून राहावे लागू नये, यासाठी तातडीची आपत्कालीन जलवितरण योजना लागू करावी.
- टँकरची गरज निर्माण करणाऱ्या परिस्थितीचे स्वतंत्र ऑडिट करावे आणि गैरप्रकार आढळल्यास कठोर कारवाई करावी.
- प्रत्येक प्रभागासाठी जबाबदार अधिकाऱ्याचे नाव, संपर्क क्रमांक आणि पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक सार्वजनिक करावे.



"आम्हाला प्रशासनाशी संघर्ष नको, तोडगा हवा आहे. धरण भरलेले असताना आणि पाऊस कोसळत असताना सोसायट्यांना टँकर मागवावे लागत असतील, तर ते नियोजनाचे अपयश आहे. नागरिक वेळेवर कर भरतात; त्या बदल्यात नियमित आणि पुरेसे पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. आठवडाभरात प्रशासनाने बैठक घेऊन कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा, अन्यथा २ ऑक्टोबरला शांततापूर्ण मार्गाने रस्त्यावर उतरण्याशिवाय आमच्यापुढे पर्याय राहणार नाही.

- सचिन लोंढे, अध्यक्ष, पीसीसीएचएसएफ.

# राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात व्ही. के. माटे हायस्कूलच्या शार्दुल देशिंगेचा गौरव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चिंचवड येथील व्ही. के. माटे हायस्कूलचा विद्यार्थी शार्दुल देशिंगे याने राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान स्पर्धेत घवघवीत यश मिळवत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'जीएमआरटी' (GMRT) तर्फे आयोजित राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन – ऑनलाइन प्रकल्प स्पर्धेत (NATIONAL SCIENCE EXHIBITION – ONLINE PROJECT COMPETITION) शार्दुलच्या 'स्वच्छता स्तंभ' (SWACHATA STAMBH) या प्रकल्पाला देशभरातून द्वितीय क्रमांक मिळाला.**







देशभरातील विविध शाळांमधून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्पांमधून शार्दुलच्या या प्रकल्पाची निवड करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांच्या कडेला वाढणाऱ्या कचऱ्याची समस्या तसेच त्यामुळे निर्माण होणारे दुर्गंधी व आरोग्याचे धोके लक्षात घेऊन त्याने हा अभिनव उपाय विकसित केला आहे.

शहरांमधील जागेच्या कमतरतेवर मात करण्यासाठी शार्दुलने उभ्या स्वरूपात (Vertical Management) कचरा साठवण्याची यंत्रणा तयार केली आहे. यात कचरा ठरावीक पातळीपर्यंत भरल्यानंतर तो वरच्या दिशेने हलवला जातो. अत्यंत कमी जागेत जास्तीत जास्त कचरा कार्यक्षमतेने साठवणे आणि त्याचे सुलभ व्यवस्थापन करणे या संकल्पनेमुळे शक्य होते.

या यशासाठी शार्दुलला वर्गशिक्षक श्री. हुचगोळ सर आणि विज्ञान शिक्षिका सौ. मीना सपकाळ यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. इंद्रायणी पिसोळकर यांचे विशेष प्रोत्साहन लाभले. शार्दुलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी त्याचे भरभरून कौतुक केले असून सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अल्पवयीन पीडितेवरील अत्याचार प्रकरणी आरोपीला २० वर्षे सक्तमजुरी

## पिंपरी-चिंचवड न्यायालयाचा निकाल, आमदार महेश लांडगे यांची फास्टट्रॅकची मागणी

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**अल्पवयीन पीडितेवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपी रामू कुंजल निसाद (वय ४०) याला २० वर्षांची सक्त कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड जिल्हा सत्र न्यायालयाचे विशेष व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एन. यादव यांनी २२ सप्टेंबर २०२६ रोजी हा निकाल दिला.**



एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात ३ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक १८१/२०२६ नुसार दाखल झाला होता. भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम ६४(१), ६५(२), ७४ आणि ३५१ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) कलम ४, ६ व ८ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीमती चैत्राली भिसे यांनी केला. तपास पूर्ण करून त्यांनी ३० दिवसांच्या आत न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. हा खटला जलदगतीने चालवावा, अशी विनंती अभियोग पक्षाच्या वतीने न्यायालयाला करण्यात आली होती. न्यायालयाने ती मान्य करून सुनावणी जलदगतीने पूर्ण केली आणि २२ सप्टेंबर रोजी निकाल दिला. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून अल्पवयीन मुला-मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून, अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये कायदेशीर प्रक्रिया प्रभावीपणे राबवून दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे, असे पोलीस उपायुक्त मारुती जगताप यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

### सरकारी पक्षाची भूमिका

या प्रकरणात विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती स्मिता मुकुंद चौगुले यांनी सरकारतर्फे साक्षीदारांची साक्ष घेऊन बाजू प्रभावीपणे मांडली. कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा एस. आर. सरसे यांनी न्यायालयीन कामकाजात प्रभावी समन्वय साधला. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक विभाग) डॉ. बसवराज तेली, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-३) मारुती जगताप, सहायक पोलीस आयुक्त सुधाकर यादव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जामदार आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) भोजराज मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बीएनएस कलम ६४(१): २० वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावास, बीएनएस कलम ६५(२): २० वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावास, बीएनएस कलम ७४: ३ वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त कारावास, बीएनएस कलम ३५१: ३ वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त कारावास, पोक्सो कलम ४: २० वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावास, पोक्सो कलम ६: २० वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावास आणि पोक्सो कलम ८: ५ वर्षे कारावास व १०,००० रुपये दंड; दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. या सर्व शिक्षा एकत्रित भोगावयाच्या आहेत.

> “ पोलीस प्रशासन आणि न्यायव्यवस्थेने संबंधित नराधमाला २० वर्षांची सक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी ठोस निर्णय घेतले जात आहेत. त्याला न्यायदेवतेची खंबीर साथ मिळत आहे.
>
> **- महेश लांडगे**, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त आरोग्य शिबिर

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त महाविद्यालय व आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन डॉ. के. निर्मला कुमारस्वामी, संचालिका, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ एमसीए अँड मॅनेजमेंट, पुणे यांनी केले. यावेळी त्यांनी जागतिक फार्मासिस्ट दिनाचे महत्त्व, नियमित आरोग्य तपासणी व रुग्ण समुपदेशनाचे महत्त्व तसेच समाजाच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यात फार्मासिस्टची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले.**



या शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबीन, हाडांची घनता, बीएमआय, फुफ्फुसांचे आरोग्य व रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण ($SpO_2$) आदी तपासण्या करण्यात आल्या. तपासणीच्या निष्कर्षांनुसार विद्यार्थ्यांनी सहभागींचे आरोग्यविषयक समुपदेशन केले.

या प्रसंगी संकुल संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (नि.), डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशनल कॉम्प्लेक्स यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना आरोग्य जनजागृती उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी निरोगी जीवनशैली व नियमित आरोग्य तपासणीबाबत समाजात जनजागृती करावी, असे त्यांनी सांगितले. या आरोग्य तपासणी शिबिराचे नियोजन महाविद्यालयातील फार्म. डी.च्या विद्यार्थ्यांनी केले होते.

आकुर्डी शैक्षणिक संकुलातील २०० हून अधिक कर्मचाऱ्यांनी शिबिराचा लाभ घेतला. नियमित आरोग्य तपासणी, योग्य औषधोपचार व रुग्ण समुपदेशनाच्या माध्यमातून आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यात फार्मासिस्टची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी सांगितले.

या शिबिराचे यशस्वी आयोजन समन्वयक डॉ. ऐश्वर्या उंचेगावकर आणि डॉ. वेंकटेश चिंतलवार यांनी डॉ. रामदास शिंदे, विभागप्रमुख, फार्मसी प्रॅक्टिस विभाग (फार्म. डी.) यांच्या मार्गदर्शनाखाली केले. तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. अनिकेत गरुड, डॉ. निकिता पारगे, डॉ. ऋतुजा हिप्परकर आणि डॉ. संकेत कदम यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थी प्रतिनिधी कुमकुम भेनवाल, गौरव गायकवाड आणि सानिया हलई यांनी शिबिराच्या आयोजनात विशेष योगदान दिले.

# DYPIMED HOSTS SIX-DAY INDUCTION PROGRAMME 2026 FOR NEW MCA STUDENTS

**MahaEnews | PIMPRI-CHINCHWAD**

**Dr. D.Y. Patil Institute of Management and Entrepreneur Development (DYPIMED) successfully organized the Induction Programme 2026 – "Utkarsh 2K26" for newly admitted MCA students from 9th to 24th September 2026. The six-day programme aimed to familiarize students with the institute, faculty, academic structure, placement opportunities and their peers through a mix of informative, interactive and creative activities.**






The programme began with registration and Saraswati Puja, followed by an institute introduction and welcome address by Dr. Ashwini Chavan, HoD – MCA, and an address by Dr. Meghana Bhilare, Director, DYPIMED. Industry insights were shared by Mr. Ravinder Pal Singh, Director Software Engineering, Amdocs, while the "SPARK – Building Connections, Creating Memories" activity was conducted by Ms. Srushti Jadhav, Mr. Yash Patel and Mr. Harshal Morkhade.

The programme continued with sessions on professional development, placements and academics. Ms. Rati Choundawar, VP – People & Culture, addressed students on team building, recruitment, employer branding, conflict management and learning & development, while Dr. Sushil Kulkarni, T&P Officer, DYPIMED, conducted a placement orientation session. Academic orientation and elective selection were guided by Dr. Ashwini Chavan, Prof. Manoj Patil and Prof. Ajinkya Ban. Team-building and outdoor activities led by Mr. Pravin Awate strengthened collaboration, communication and team spirit, followed by a hands-on Ganpati Idol Making Workshop that encouraged creativity and participation.

The concluding sessions focused on entrepreneurship, motivation, cyber security and cultural engagement. Mr. Sajin Sudhakaran, Director, Silverhorse India Pvt. Ltd., conducted a session on "Entrepreneurial Mindset", followed by an inspiring session by Mr. Rahul Nalawade, Motivational Speaker and Corporate Trainer, on the life and character of Chhatrapati Shivaji Maharaj. Mr. Vinit Beri, Information and Cyber Security Consultant, sensitized students about cyber threats and digital safety, while Mr. Shreyash Deshpande, Director and Cultural Head, conducted an engaging session on music. The programme provided students with a vibrant platform to Connect, Learn, Participate and Grow, combining academic orientation, industry interaction, leadership, entrepreneurship, cyber awareness, teamwork and cultural learning.

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे अग्निसुरक्षा प्रशिक्षण व मॉक ड्रील संपन्न

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**शाळेतील अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी पूर्वतयारी म्हणून प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी विशेष अग्निसुरक्षा प्रशिक्षण व प्रात्यक्षिक सरावाचे (MOCK DRILL) आयोजन करण्यात आले. या उपक्रमात इयत्ता ११वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांनीही प्रत्यक्ष सहभाग नोंदवून आपत्कालीन सज्जतेचे धडे घेतले.**



'सॅप इंजिनिअर्स'चे (SAP Engineers) प्रतिनिधी राहुल शिरसाट यांनी उपस्थितांना अग्निशामक यंत्रणेबाबत सविस्तर प्रशिक्षण व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवली. यावेळी त्यांनी आगीचे विविध प्रकार, आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशामक यंत्रांचा योग्य वापर, त्याची कार्यपद्धती आणि संभाव्य आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षक, कर्मचारी, कार्यालयीन मदतनीस (मावशी) तसेच सुरक्षा पथकातील सदस्यांना विशेष प्रशिक्षण देऊन सज्ज करण्यात आले.

प्रशिक्षणादरम्यान विविध प्रकारची अग्निशामक यंत्रे, फायर होज पाईपचा वापर आणि शाळेतील अंतर्गत अग्निसुरक्षा प्रणाली कशी कार्यान्वित करावी, याचे थेट प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. शिक्षक व कर्मचाऱ्यांनी स्वतः ही यंत्रे हाताळून आग विझवण्याचे कौशल्य आत्मसात केले.

शाळा प्रशासनाने राहुल शिरसाट आणि 'सॅप इंजिनिअर्स' यांच्या मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त करत त्यांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी शाळेत अधिक सुरक्षित वातावरण तयार होण्यास मोठी मदत होत असल्याचे शाळा व्यवस्थापनाने स्पष्ट केले.